■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९२ ■ गुरूवार दि.१० जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 292 ■ Thursday Dt.10 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# आमदार धनंजय मुंडे संकटांवर मात करणारा राजकारणातील अजिंक्य योद्धा..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## धनंजय मुंडे यांनी संयम बाळगून वेट अँड वॉचची भूमिका घेतल्याने राजकीय परिपक्वतेचे दर्शन पुन्हा घडले!

## धनंजय मुंडे राजकारणातला अढळ स्थान आणि अजिंक्य चेहरा!

## सत्तेच्या समिकरणात बदल झाला तरी धनंजय मुंडे अजूनही जनतेच्या मनात!



## धनंजय मुंडे कधीच राजकारणात हरणार नाहीत, महाराष्ट्रातील जनतेचा ठाम विश्वास!

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मातब्बर नेत्यांमध्ये समावेश असलेले आमदार धनंजय मुंडे हे नाव आजही जनतेच्या मनात अढळ आहे. वेळोवेळी आलेल्या राजकीय वादळांना सामोरे जात त्यांनी आपली नेत्याची छबी अधिक ठामपणे निर्माण केली आहे. त्यामुळेच आमदार धनंजय मुंडे कधीच राजकारणात हरू शकत नाहीत असे समर्थपणे म्हटले जात आहे. धनंजय मुंडे यांचा राजकीय प्रवास संघर्षांनी भरलेला असला तरी प्रत्येक संकटातून त्यांनी नव्याने उभारी घेत आपले अस्तित्व सिद्ध केले. परळी विधानसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा त्यांचा दणदणीत विजय झाला असून, जनतेशी असलेली नाळ अजूनही घट्ट आहे. त्यांच्या कार्यकाळात सामाजिक न्याय, कृषी आणि अन्न व नागरी पुरवठा विभागासारख्या महत्त्वाच्या खात्यांचे त्यांनी यशस्वीपणे नेतृत्व केले.

धनंजय मुंडे हे उपमुख्यमंत्री अजित पवार गटातील महत्त्वाचे नेते मानले जातात. मंत्रिमंडळ फेररचनेत छगन भुजबळ यांना संधी मिळाल्यानंतर धनंजय मुंडे यांना डावलण्यात आल्याच्या चर्चांना उधाण आले. मात्र, त्यांनी संयम बाळगून 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतल्याने त्यांच्या राजकीय परिपक्वतेचे दर्शन पुन्हा घडले. सतत आरोप-प्रत्यारोपांच्या केंद्रस्थानी राहूनही त्यांनी राजकीय अस्तित्व अबाधित ठेवले आहे. ओबीसी समाजाचे प्रभावी नेतृत्व, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि विरोधकांवर वेळप्रसंगी निशाणा साधण्याची शैली यामुळे त्यांची लोकांमधील पकड अजूनही मजबूत आहे.

अलिकडेच त्यांनी घेतलेली विपश्यना साधना हे ही एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. सध्याच्या राजकीय गोंधळातही त्यांनी संयमी आणि निगर्वी भूमिका घेतल्याने खरा नेता कोण? याचे उत्तर अनेकांना सापडले आहे. राजकीय विश्लेषकांचं मतही स्पष्ट आहे धनंजय मुंडे हे लवकरच राजकारणात नवी भूमिका बजावताना दिसतील. पक्षातील स्थिती काहीही असली तरी त्यांचं जनाधार मजबूत आहे. त्यामुळेच, धनंजय मुंडे हे कधीच हरू शकत नाहीत' ही फक्त वक्तव्य नसून, ते त्यांच्या कर्तृत्वाने पुन्हा पुन्हा सिद्ध करत आहेत. त्यांचा राजकीय प्रवास सूत्रबद्ध असला तरीही, जनाधार, नेतृत्व, पक्षीय पाठिंबा आणि ओबीसी नेतृत्वाच्या वजनामुळे धनंजय मुंडे राजकारणाची लढाई कधीच सोडणार नाहीत, असे ठामपणे स्पष्ट आहे. मंत्रिमंडळातील तीन मुख्य विभाग सामाजिक न्याय, कृषी, अन्न पुरवठा हे सांभाळले आहेत. विरोधी पक्षनेतेपद, जिल्हा पालक मंत्री यांसारखे नेतृत्वाच्या पदी त्यांनी कार्य केले, ज्यामुळे त्यांची सर्वसमावेशक छबी पुढे आली. अजित पवारांचे विश्वासू म्हणून त्यांना स्थान मिळालं. संकट आणि तणावांवर मात करण्याची त्यांची क्षमता त्यांनी दाखवली. अजित पवार पक्षात त्यांनी विश्वास टिकवून त्यांचा राजकीय भविष्यासाठी मजबूत आधार निर्माण केला आहे.

## खोटी भरती जाहिरातींविषयी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पशु आरोग्य सेवक या पदासाठी शासनामार्फत भरती होत असल्याची खोटी माहिती सोशल मीडियावर व विविध माध्यमांतून प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात पशुसंवर्धन विभागामार्फत अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे की सद्यस्थितीत अशा कोणत्याही भरतीसाठी प्रक्रिया सुरू नाही. ही माहिती फसवणूक करणाऱ्यांनी हेतुपुरस्सर पसरवली असून त्याद्वारे आर्थिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा बनावट भरतीच्या जाहिरातींना बळी न पडता नागरिकांनी अधिकृत शासकीय संकेतस्थळांवरूनच खात्री करावी. बीड शहर पोलीस विभागामार्फत यासंदर्भात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या बनावट जाहिरातींवर लक्ष ठेवून आवश्यक कायदेशीर कारवाई करणार आहोत. यासाठी कोणाच्या तक्रारी असल्यास त्याची दखल घेऊन त्याविरुद्ध सुद्धा कारवाई करणार आहोत. सायबर क्राईम विभागामार्फत तपास व खोटी माहिती देणाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल. सोशल मीडिया, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थि, सार्वजनिक ठिकाणी या ठिकाणी देण्यात येणारी माहिती, पाम्प्लेट्स, याद्वारे नागरी जनतेसाठी जागरूकता मोहीम राबवण्यात येणार आहे. बनावट वेबसाइट्स व मोबाईल नंबर बंद करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय समन्वय साधून अशा



पान २ वर

## वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दारुची अवैध वाहतूक करणारी गाडी पकडली

**सिद्धार्थ गोरे रवी आघावाची उल्लेखनीय कामगिरी**

बीड । प्रतिनिधी

अवैधरित्या विदेशी दारुची वाहतूक करणारी कार पकडून विविध प्रकारच्या विदेशी दारुच्या बाटल्या किंमत १० हजार २४० व कार ५ लाख असा एकूण ५ लाख १० हजार २४० चा मुद्देमाल बुधवारी (दि.९) जप्त करण्यात आला. ही कारवाई वाहतूक शाखेने केली असून एका आरोपी विरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बुधवारी (दि. ९) वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप व पोलीस शिपाई सिद्धांत गोरे हे नगर नाका भागात पेट्रोलिंग करीत असताना नगर नाका मार्गे नाट्यगृहाकडे एक पांढऱ्या रंगाची कार अवैध दारु

पान २ वर



## संपादकावर हल्ला करणे संस्था चालकाला भोवले, पत्रकार एकजुटीच्या विजय

### पत्रकार संरक्षण कायदे अंतर्गत सईद बेग व कागजी तक्रार विरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

संस्थेतील शाळेच्या विरोधात बातम्या का छापल्या ? या कारणावरून संस्था चालक मिर्झा सईद बेग अनवर बेग आणि शिक्षक कागझी एकरार यांनी दै.बीड संघर्षचे संपादक खमरूल इमान यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात बीड शहर पोलीसांनी केवळ एनसी दाखल केली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने काल दुपारी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन त्यांना मारहाणीचे सीसीटीव्ही फुटेज दाखवले. त्याचबरोबर या प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली. त्यानंतर काल रात्री उशिरा संस्था चालक मिर्झा सईद बेग व शिक्षक कागजी एकरार या दोघांविरूध्द पत्रकार संरक्षण कायद्यासह बीएनएस ४, ११५(२), ३५२, ३५१ (२), ३(५) प्रमाणे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

बीड येथील दै.बीड संघर्षचे संपादक मोहम्मद खमरूल इमान खान जफर खान नाझ यांच्या फिर्यादीवरून बातम्या छापल्याच्या रागातून हल्ला करणारे अन्वर बेग उर्दु प्राथमिक शाळा खासबाग बीड येथील संस्था चालक मिर्झा सईद बेग अन्वर बेग आणि शिक्षक एकरार अहेमद असरार अहेमद कागजी (दोघे रा.बीड) यांच्या विरूध्द शिवीगाळ करून मारहाण करणे, जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान दि.५ जुलै २०२५ रोजी संपादक खमरूल इमान यांच्यावर हल्ला झाला होता. त्याचवेळी खमरूल इमान यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र पोलीसांनी केवळ एनसी दाखल करून वेळ मारून घेण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, अमजद खान, शेख ताहेर, शेख आयशा, शेख वसीम, शेख अय्युब, दिपक थोरात, रईद खान, सिराज आरजू, जावेद पाशा, शेख इरफान, समीर

पान २ वर

## अवैध दारुची चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमास मोटारसायकलसह घेतले ताब्यात

बीड । प्रतिनिधी

दि.०९/पोलीस ठाणे मील प्रभारी अधीकारी बहर साहेब यांचे आदेशाने अवैध धंद्यावर केोह/१७६३ मो.अं./९३ गणेश की हाणे हद्दीत पाली बीट हद्दीत बीड ते परत पांगर बावर येथे असताना गुप्तवाल वासमार्फत बातमी मिळालेवरुन ईसम नामे चंद्रकात रा.मौज ता.जि.बीड हा त्याचे ताब्यातील लालरंगाची मो.सा. टि.व्ही.एस. कं. पासींग नं.चक-२३ इइ-१०८४ हिस सिटचे बाजुस हुकला दोन पांढऱ्या रंगाच्या पिशव्यामध्ये विनापरवाना बेकायदेशिररित्या प्रो. गुन्ह्याचा माल विदेशी दारुची, चोरटी



वाहतुक कर तिकी करण्यासाठी घेवुन जात असताना मिळुन आला त्याचे ताब्यातील मो.सा. पासींग नं. चक-२३ इइ-१०८४ उयायामुने सिटचे हुकला बांधलेल्या अडकवलेल्या दोन पांढऱ्या रंगाच्या पिशव्यामध्यै प्रो. गुन्हाचा माल वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारुच्या बाटल्या एकुन किमती ११५५०/- रुपये व चोरटी वाहतुक करणेकरता वापरलेली मो.सा जु.वा. कि.अ.५००००/- रुपये असा एकुन ६१,५५०/- रुपयाचा माल मिळुन आला.

मिळुन आलेला इसम चंद्रकांत भालचंद्र येडे यास त्याचे ताब्यातील प्रो. गुन्ह्याचा माल दारु सेवन अगर वाहतुक परवाना आहे काय ? व कोठुन आणला अगर दिला? बाबत विचारणा केली असता चंद्रकांत भालचंद्र येडे याने कोणताही परवाना नसले बाबत कळवुन दारुचा माल हा सम्राट वाईन शॉप, जालना रोड, बीड येथुन आणला आहे. तेथुन माल देणा-याचे मला नाव गाव माहीत नाही असे सांगीतले, वरुन मिळुन

पान २ वर

# आंतरजिल्हा मोटार सायकल चोरी करणारा सराईत आरोपी स्था.गु.शा. बीडने केला निष्पन्न

## तब्बल ०६ मोटार सायकली जप्त करुन ०५ गुन्हे आणले उघडकीस

बीड । प्रतिनिधी
मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पोलीस पोउपनि श्री. महेश विघ्ने यांना गोपनिय माहिती मिळाली की, इसम नामे गोकुळदास बोरगे हा चोरीची मोटार सायकल विक्री करण्याकरीता गिन्हाकाचे शोधात मांजरसुंबा येथे



आलेला आहे. त्यावरुन लागलीच पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवार स्था.गु.शा.बीड यांना बातमी कळवुन त्यांनी खबरेचे अनुषंगाने जावुन कारवाई करण्याचे आदेश दिल्याने पोउपनि श्री. महेश विघ्ने व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी मांजरसुंबा येथील शिकर इंग्लीश स्कुल येथे आरोपीचे राहते घरी जावुन शोध घेतला असता त्याचे घरासमोर एक मोटार सायकल मिळुन आली सदर मोटार सायकल बाबत विचारणा केली असता सदरची मोटार सायकल त्याने बीड येथुन चोरी केली असल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्याने सोलापुर, अहिल्यानगर, बीड येथुन वेगवेगळ्या ठिकाणांवरुन एकुण ०६ मोटार सायकल चोरी केल्या असल्याचे सांगितले. सदरच्या मोटार सायकल ह्या त्याचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या असुन अभिलेखावरील खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.
यासंदर्भात शिवाजीनगर (बीड), केज (बीड), पेठ बीड (बीड), वडवणी (बीड), सदर बाजर (सोलापुर शहर) जप्त केलेली वाहने कलम आरोपी नामे गोकुळदास मगर बोरगे रा. बाभळखुटा ता. जि.बीड याचे ताब्यातुन एकुण ०६ मोटार सायकली कि.अं. १,५०,०००/ – रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीचा पुर्व इतिहास पाहता तो मोटार सायकल चोरी करण्याचे सवईचा असून त्याने यापूर्वी सन २०२४ मध्ये त्यांचेकडुन २२ मोटार सायकल जप्त करुन १८ गुन्हे स्था.गु.शा. बीड ने उघडकीस आणले होते.
सदरची कामगिरी मा.श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक, बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. शिवाजी बांटेवाड पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री. महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह जफर पठाण, पोह/दिपक खांडेकर, पोअं/बाप्पासाहेब घोडके, चापोह/गणेश मराडे सर्व स्था.गु.शा. बीड यांनी मिळून केलेली आहे.

# महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या मराठवाडा उपाध्यक्ष व प्रवक्तेपदी नोटरी ॲड राहुलकुमार राका यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी
महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी व प्रवक्तेपदी गेवराई जि.बिड येथील भारतीय जनता पार्टीचे युवा नेते तथा दि वैद्यनाथ बँक सल्लागार व दैनिक बीड वास्तव चे उपसंपादक नोटरी ॲड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांची निवड महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे महाराष्ट्राचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली व महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे उपाध्यक्ष नोटरी ॲड महावीर एम कांकरिया, प्रभारी अध्यक्ष नोटरी ॲड यशवंत खराडे, उपाध्यक्ष नोटरी ॲड नितेश ललवाणी व महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन सचिव नोटरी ॲड प्रवीण नलावडे यांनी अपॉइंटमेंट पत्र देऊन निवड केली आहे.



भारतीय जनता पार्टीचे युवा नेते नोटरी ॲड राहुलकुमार राका हे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आहेत तसेच दि वैद्यनाथ बँकेचे सल्लागार आहेत व दैनिक बीड वास्तव उपसंपादक पण आहेत त्यांचे सामाजिक – शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमात हमेशा हिरीरिने सहभाग असतो. या त्यांच्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन चे अध्यक्ष नोटरी ॲड सय्यद सिकंदर अली व महाराष्ट्र अँड गोवा चे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष नोटरी ॲड महावीर एम कांकरिया यांनी निवड केली आहे त्यांच्या या निवडीबद्दल नोटरी ॲड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांचे सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ९ ऑगस्ट रोजी पिंपरी चिंचवड जिल्हा पुणे येथे महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे राज्य अधिवेशन होणार आहे. यामध्ये विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल जी व केंद्रीय मंत्री किरण रीजूजी व महाराष्ट्रातील जजेस व मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी आपली नाव नोंदणी करावी व सर्वांनी उपस्थित राहावे असेही आवाहन नवनिर्वाचित महाराष्ट्र अँड गोवा चे उपाध्यक्ष नोटरी ॲड राहुलकुमार राका यांनी केले आहे.

# मासिक पाळीच्या नावाखाली मुलींचा छळ! बाईच्या बाईपणाचा बाजार मांडलात का?

## भाजप आमदार चित्रा वाघ यांचा संतप्त सवाल

मुंबई । प्रतिनिधी
शहापूरमधील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या नावाखाली विवस्त्र करून तपासणी करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत बाईच्या बाईपणाचा बाजार मांडलात का? असा थेट सवाल करत संताप व्यक्त केला आहे.



भाजपच्या आमदार चित्रा वाघ म्हणाल्या की, मुलींच्या आत्मसन्मानाला काळीमा फासणारी ही घटना आहे. शाळा ही सुरक्षित जागा असायला हवी, पण इथे तर मुलींना अपमानाचा घोट प्यायला लावला जातोय.

**नेमके प्रकरण काय?**
ठाणे जिल्ह्यातील शहापूर शहरातील आर. एस. दमाणी इंग्लिश स्कूलमध्ये घडला. पाळी आली आहे का, याची तपासणी करण्याच्या नावाखाली विद्यार्थिनींची मानहानी केल्याचा आरोप आहे. पालकांच्या तक्रारीवरून संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांविरोधात झजउडज कायद्याखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### पाळी येणं गुन्हा नाही !

चित्रा वाघ म्हणाल्या की, पाळी येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, लाजेचा नाही की शिक्षा करण्याचा विषय नाही. शाळेतील शिक्षकांनी जर असे कृत्य केले असेल, तर त्यांनी आधी आपल्या घरातल्या मुलीकडे पाहावे त्यांचेही बाईपण असते ना. या प्रकरणी मुख्याध्यापिका, पाच शिक्षिका, दोन महिला कर्मचारी आणि एक शिपाई या आठ जणांविरोधात झजउडज कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाघ यांनी स्पष्ट केले की, आता फक्त ही आठ जणच नाही, तर यामागे आणखी कोण आहे हेही तपासले जाईल. आम्ही ही घटना हलक्यात घेणार नाही.

### आम्ही अशा वागणुकीला माफ करणार नाही

आमदार चित्रा वाघ म्हणाल्या की, सांगलीतील आमच्या कार्यकर्त्या स्वाती शिंदे तातडीनं घटनास्थळी पोहोचल्या. पालक, पोलिस आणि मुली यांच्याशी चर्चा झाली. पोलिस यंत्रणा सजग आहे, ११२ क्रमांकावर मदतीसाठी फोन करा. शाळा म्हणजे ज्ञानमंदिर असते. तिथे जर असा अपमान होत असेल, तर ही संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची हार आहे. आम्ही मुलींच्या आत्मसन्मानासाठी लढा उभारणारच! असा ठाम इशारा त्यांनी दिला.

# अपघात अपघात असतो; नाहक धस कुटुंबाची बदनामी करु नका : आण्णासाहेब शिरसाठ

दौलावडगाव । प्रतिनिधी
तीन चार दिवसापुर्वी पुणे अहिल्यानगर रस्त्यावर रात्रीच्या वेळी दुचाकी, चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याने या दुर्दैवी अपघात एका तरूणाचा मृत्यू झाला. आणि सोशल मीडियावर आ.सुरेश धस याचे चिरंजीव सागर धस याच्यावर टिका टिप्पणी करून बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अपघात अपघात असतो; नाहक धस कुटुंबाला बदनाम करू नका असे अरणविहरा गावचे सरपंच तथा भावी पंचायत समिती सदस्य आण्णासाहेब शिरसाठ यांनी बोलतांना सांगितले.



आष्टी मतदारसंघातील जनतेच्या सुखदु:खात सदैव सहभागी असलेले व अडचणीच्या काळात स्वताच्या जीवाचा कसलाही विचार न करता २४ तास जनसेवेत असलेले धस कुटुंब आणि याच कुटुंबावर आता विनाकारण आरोप होत आहेत.आ.सुरेश आण्णा धस याचे चिरंजीव युवानेते सागर आप्पा धस याचा तीन चार दिवसांपुर्वी आष्टीवरून पुण्याला जात असताना सुपा येथे दुचाकी आडवी आल्याने रात्रीच्या दरम्यान अपघात झाला. यात दुचाकीवरील तरूणाचा मृत्यू झाला. त्याच्या दुखात धस कुटुंब सहभागी आहेच. पण सोशल मीडियावर विनाकारण खालच्या पातळीवर जाऊन आरोप केले जात आहेत. अपघाताचे राजकारण करू नका अपघात हा अपघात असतो. तो अचानक होतो कोणी जाणिवपुर्वक करत नाही. विनाकारण धस कुटुंबावर आरोप करून बदनाम करू नका असा सल्ला उतावीळ सोशल मीडियावरील लोकांना आण्णासाहेब शिरसाठ यांनी दिला आहे.



आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ.) कैज तालुका मराठा आघाडी कार्य कारणी जाहीर केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले व मराठा आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष मा. बाबासाहेब मिरजे पाटील यांच्या आदेशानुसार व बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदीपान (तात्या) व हजारे ठझ ख () मराठा आघाडी जिल्हा अध्यक्ष नवनाथ तपसे व केस तालुका अध्यक्ष सुनील जी हिरवे यांच्या उपस्थितीत महादेव श्रीरंग ढवारे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली व त्यांना नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्तित कैज तालुका कार्येकरते बाबुराव गलफाडे, वेंकट हजारे, अमोल मस्के, सुधीर हजारे, भारत इंगळे, गोटू हजारे, शैलेश हजारे इत्यादी कार्य करते उपस्थित होते.

# नागरिकांना सर्व सुविधा गतिमानतेने देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## परळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

बीड । प्रतिनिधी
शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तत्पर व गतिमान पद्धतीने देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. सर्व नागरिक यांनी दर सोमवारी व गुरुवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत होणाऱ्या जनता दरबारमध्ये आपल्या समस्या रास्तपणे प्रशासनाकडे मांडव्यात, त्यांचे निराकरण तात्काळ करण्यात येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना दिला.
परळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टोकवाडी येथे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत महसूल विभागाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बालविवाह रोखणे व व्यसनमुक्तीबाबत शपथही नागरिकांना त्यांनी दिली. यावेळी परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार वेंकटेश मुंडे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, परवीन पठाण, राजाभाऊ ढगे, सरपंच गोदावरी राजाराम मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू उर्फ बालाजी मुंडे, श्याम आघाव, डॉक्टर नामदेवा आघाव, डॉक्टर सतीश घुगे, पोलीस निरीक्षक मझर सय्यद, मंडळ अधिकारी अरबी कुमटकर, मंगल मुंडे, नीता कोल्हेवाड, गणेश फड, विस्तार अधिकारी



अंभोरे, तालुका कृषी अधिकारी राठोड, अव्वल कारकून बालाजी कचरे व सर्व तलाठी यांची उपस्थिती होती.
शिबिरात वारस फेरफार व सातबारा २१ शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. इतर हक्कात नोंदी दुरुस्त केलेली सातबारा १३ शेतकऱ्यांना सातबारा वितरित केले. शेतरस्ते नोंदी केलेल्या तीन शेतरस्ता सातबारा शेतकऱ्यांना व्यतिरिक्त केले. ४० विद्यार्थ्यांना उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीत वीज पडून मयत झालेल्या जनावरांच्या मौजे दौनापूर व गुट्टेवाडी शेतमालकास शासकीय मदत देण्यात आली. मौजे बोरखेड येथील शेतकरी आत्महत्या कुटुंबास व मौजे सारडगाव येथील वीज पडुन जखमी झालेल्या व्यक्तीस शासकीय अनुदान मदत देण्यात आली. महिला व बाल विकास विभागाकडून चार लाभार्थ्यास बेबी किट वाटप करण्यात आले. तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त मौजे मालेवाडी कुटेवाडी वाघाळा येथील चार कुटुंबीयांना तूर बियाणे मिनी किट वाटप करण्यात आले. मोजणी खात्याकडून गावठाण हद्दीतील १० शेतकऱ्यांना सनद वाटप व नकाशे यांचे वितरण केले. एकूण ९९ शेतकरी व विद्यार्थी यांना विविध लाभाचे वितरण जिल्हाधिकारी जॉन्सन व अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार आघाव यांनी मानले. परळी व पिंपळगाव गाढे या मंडळातील अनेक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आठवीच्या वर्गाचे उदघाटन**
जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून शाळेत नव्यानेच मान्यता मिळालेल्या आठव्या वर्गाचे उद्घाटनही झाले. जिल्हा परिषद शाळेच्या प्रागंणात विविध महिला बचत गटाचे, तसेच महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग , पंचायत समिती विभागाचे विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्याचबरोबर सामाजिक अर्थसहाय्य योजना व पुरवठा विभागाचे लाभार्थी, शेतकरी फार्मर आयडी व डीबीटी करिता विशेष पथकाचे कॅम्प उभारण्यात आले होते.

**तालुका क्रीडा संकुल, औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट**
टोकवाडी येथील समाधान शिबिरानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व महसूल अधिकारी यांच्यासह तालुका क्रीडा संकुल परळी येथील जागेची पाहणी केली. तसेच औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत मुख्य अभियंता सुनील इंगोले व मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे देखील उपस्थित होते. दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी यांनी सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांची तालुकास्तरीय आढावा बैठक घेतली. सायंकाळी उशिरापर्यंत धर्मापुरी येथील किल्ला व केदारेश्वर मंदिर तसेच मरळसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर येथे भेट देऊन पुरातत्त्व विभागाचे वतीने चालू असलेल्या कामाची पाहणी करून गावकऱ्यांशी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी संवाद साधला.

पान १ वरून...

### खोटी भरती जाहिरातींविषयी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

प्रकारच्या वेबसाईट किंवा मोबाईल नंबर शोध घेऊन ते बंद करण्यात येतील.
नागरिकांनी कोणतीही भरती किंवा जाहिरात मिळाल्यास तीची खातरजमा अधिकृत शासकीय संकेतस्थळावरून करावी. कुठलीही संशयास्पद माहिती आढळल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन बीड शहर पोलीस करत आहे. बाबा राठोड, प्रभारी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक, बीड शहर यांनी केले आहे.

### वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दारुची अवैध वाहतूक करणारी गाडी पकडली

घेऊन जात असल्याची माहिती मिळाली.
या माहितीच्या आधारे संशयित कार थांबवून झडती घेतली असता त्यामध्ये एम्पेरीयल ब्लू व्हीस्की, रॉयल स्टँग व्हीस्की, ग्रॅण्ड मास्टर ऑरेंज वोडका या विविध कंपनीचा विदेशी दारुच्या बाटल्या मिळून आल्या ज्याची किंमत १० हजार २४० रु. आणि वाहतूक करणारी स्विफ्ट कार क्र. एम.एच. १६ बी. वाय. २०११ किंमत ५ लाख असा एकूण ५ लाख १० हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपी अशोक पिराजी जाधव रा. लोणी घाट ता.जि.बीड यास ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध पोलीस शिपाई सिद्धांत गोरे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ६५ (अ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप, पोलीस शिपाई सिद्धांत गोरे यांनी केली.

### संपादकावर हल्ला करणे संस्था चालकाला भोवले, पत्रकार एकजुटीच्या विजय

काझी आदिंच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन या प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून सईद बेग यांच्या सर्व शाळा व संस्थांची सखोल चौकशी करण्याबाबत निवेदन दिले होते. सदरील निवेदनाची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रात्री उशिरा बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**वरिष्ठांचे आदेशावर सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांची उत्तम कामगिरी**
सदरील प्रकरणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने निवेदन देण्यात आल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीतकावर यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांना पडताळणी व कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठांचे आदेशावर बीड शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांनी उत्तम कामगिरी करत या प्रकरणाची परतावाणी करून शेवटी पत्रकारांना नाय देण्याचे काम केले आहे. पत्रकार संरक्षण कायदा २०१७ अंतर्गत जिल्ह्यात दाखल होणारा हा पहिलाच गुन्हा असून या आधारे पत्रकारांना संरक्षण मिळण्याचे मार्ग मोकळे झाल्याचे दिसून येत आहे. या कामगिरीबद्दल जिल्ह्याभरातून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांच्या आभार व्यक्त केला जात आहे.

### अवैध दारुची चोरटी वाहतुक करणाऱ्या

आलेला इसम व सम्राट वाईन शॉप, जालना रोड, बीड याचे मॅनेजर विरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याप्रम्प्रणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.
सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड श्री नवनीत कॉवत सर, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग बीड श्री कमलेश मिना साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. मारुती खेडकर, पोह/मनोज जोगदंड, पोअ/गणेश कांदे, पोना/नामदेव सानप यांनी केली.

# जयभवानीचे नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट : अमरसिंह पंडित

## जयभवानी सहकारी साखर कारखान्याचा ४३ वा रोलर पुजन समारंभ संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाची संपुर्ण तयारी झाली असून या गळीत हंगामात नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असल्याचे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी कारखान्याचे रोलर पुजन करताना ते बोलत होते.



जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६व्या गळीत हंगामाची सुरुवात करण्याच्या दृष्टीने रोलर पुजन हा पहिला टप्पा आज बुधवार दिनांक ९ जुलै २०२५ बुधवार रोजी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महंत जनार्धन महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, यांच्यासह संचालक कुमारराव ढाकणे, जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, राजेंद्र वारंगे, श्रीराम आरगडे, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, नारायणराव नवले, शरद चव्हाण, सुनील पाटील, संदीपान दातखिळ, नंदकिशोर गोरडे, जगन्नाथ दिवाण आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, जयभवानी सहकारी साखर कारखान्याची च्या ४३ व्या गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरू असून कारखान्याने मागील गळीत हंगामात ४ लाख ४१ हजार ५७१ मेट्रिक टन ऊस गाळप करून ३ लाख ९० हजार ३९० टन साखर उत्पादन झालेले आहे तर १०.४१ टक्के सरासरी साखर उतारा आलेला आहे. आसवणी प्रकल्पामधून ६६.९० लाख बल्क लिटर एवढे बी-हेवी स्पिरीट उत्पादित झालेले आहे. गळीत हंगाम २०२५-२६ साठी कार्यक्षेत्रात १४ हजार हेक्टर ऊसाची नोंद झाली असून त्यापासून अंदाजे १०.५० लाख मेट्रीक टन ऊस गाळपास उपलब्ध होईल. बिगर नोंदीचा ४ हजार हेक्टर ऊस असून त्यापासून ३ लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध होणार असून एकूण १३.५० लाख मेट्रिक टन ऊस कारखाना कार्यक्षेत्रात उपलब्ध आहे. त्यापैकी कारखान्याने ९ लाख मेट्रिक टन गाळपाचे उदिष्ट ठरविलेले आहे. कारखान्याने ऊस तोड वाहतूक यंत्रणेची उभारणी चालू असून जसजसे तोडणी वाहतूक करार पूर्ण होत आहेत तसे यंत्रणेस पहिला हप्ता अदा करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी हनुमान कोकणे, चंद्रकांत पंडित, गणपतराव राठोड, जयदीप औटी, फुलचंद बोरकर, उद्धव पैठणे, रावसाहेब काळे, बळीराम रसाळ, दिनकर काळे, सुभाषराव मस्के, किरण वावरे, कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, चिफ इंजिनिअर अशोक होके, चीफ इंजिनिअर ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य शेतकी अधिकारी सुदामराव पघळ, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, डिस्टलरी इनचार्ज राजेंद्र बडे, डिस्टलरी इनचार्ज दिनेश बिरकुटे, चीफ केमिस्ट श्रीमंत जाधव, चिफ केमिस्ट सिव्हील इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस.एन.औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके, ऊस पुरवठा अधिकारी वच्छिष्ट कुटे, हेड टाईम किपर सचिन उधे, कार्यालयीन अधीक्षक गोविंद चव्हाण, केनयार्ड सुपरवायझर ज्ञानेश्वर जामकर, स्टोअर किपर राजेंद्र ढेंगळे, डॉ. संभाजी पवार, उद्धव पारे, ऋषिकेश शिंदे, महेश गुंजाळ, विष्णु गायकवाड यांच्यासह कामगार, कर्मचारी, अधिकारी, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, कार्यक्रमास उपस्थित होते.



# टोकवाडी जिल्हा परिषद शाळेस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील टोकवाडी येथील जि.प.प्राथमिक शाळेश दि.९ जुलै २०२५ बुधवार रोजी बीड चे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भेट देऊन इयत्ता ८ वी ९ वी (वर्ग वाढ) वर्गाचे उद्घाटन, वृक्षारोपण, शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी करत विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी काही विद्यार्थ्यांना शालेय प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांचे उत्तर ऐकून त्यांनी शाळेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले.

जिल्हाधिकारी यांचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टोकवाडीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले. यावेळी त्यांच्या समवेत अंबाजोगाई चे अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे मॅडम, परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे डॉ.राजाराम मुंडे, सरपंच सौ.गोदावरीताई मुंडे व इतर वरिष्ठ अधिकारी कर्मचारी, शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक जि.प.प्रा.शा. टोकवाडी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संत गाडगेबाबा मा.वि.खंडेश्वरी रोड बीड येथे गुरू पौर्णिमानिमित्ताने क्रांतीसूर्य महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पूजन करून आज आनंदी वातावरणात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठशिक्षक पवार होते. यावेळी काळे, दराडे, वडमारे यांनी शाळेतील मुला-मुलींना सखोल मार्गदर्शन केले. शाळेतील मुला-मुलींनी आपापली मते भाषणात व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग शिंदे यांनी केले.

# लिंबारुई येथे मौन अनुष्ठान हाटयोगी साधना

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबारुई येथील दक्षिणाभिमुख स्वयंभू संगमेश्वर व स्वयंभू महादेव मंदिरात मठाधिपती बालयोगी भगवान महाराज दि.९ जुलैपासून मौन अनुष्ठान हाटयोगी साधनेस सुरुवात करणार आहेत. ही साधना सहा महिने चालणार असल्याची माहिती देण्यात आली.

लिंबारुई येथे संगमेश्वर गणेश व महादेवाचे मंदिर आहे. या मंदिरात चे मठाधिपती म्हणून श्री बालयोगी भगवान महाराज हे गत अनेक दिवसापासून काम करत आहेत. या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असतात. यावर्षी मोहन अनुष्ठान हाटयोगी साधना महाराज करणार आहेत जुलै महिन्यात या साधनेला सुरुवात होणार असून समारोप डिसेंबर महिन्यात होणार आहे दि.९ जुलै रोजी दुपारी बालयोगी श्री भगवान महाराज या साधनेला सुरुवात करणार आहेत. या कालावधीमध्ये महाराज कोणाच्याही संपर्कात राहणार नाहीत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय तपोनिधी आखाड्याचे सचिव गणेशानंद सरस्वती स्वामी महाराज व अखिल भारतीय संत समिती महाराष्ट्र राज्याचे मुख्य संरक्षक धर्मगुरू अमृत आश्रम स्वामी महाराज यांची उपस्थिती राहणार आहे. दि. ९ जुलै रोजी सुरू झालेल्या या मौन अनुष्ठान हाटयोगी साधनेचा समारोप दि. २० डिसेंबर रोजी म्हणजे सहा महिन्यानंतर होणार आहे.

# राष्ट्रवादीचे नेते भारत ताटे यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

## सर्व महापुरुषांची पुस्तके, छत्री, फळे वाटप, वृक्षारोप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

परळी । प्रतिनिधी



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते भारत ताटे यांच्या जन्मदिनानिमित्ताने विविध सामाजिक उपक्रम आयोजित करून वाढदिवस साजरा केला जाणार आहे. त्यामध्ये मान्यवरांच्या सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह भिमनगर व सुगंध कुटी बुद्ध विहार जगतकर गल्ली येथे अभिवादन करून अभिवादन कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. लागलीच मान्यवरांच्या हस्ते सकाळी वृक्षारोपण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथील वाचनालयास सर्व थोर व महन महापुरुषांची आत्मचरित्र भेट देण्यात येणार आहे, १० वी, व १२ वी च्या परीक्षेत यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. त्याचबरोबर भीमनगर व गाव भागातील परिसरात भव्य असे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. परळी ग्रामीण रुग्णालय येथे फळे वाटप, पावसाळ्याचे दिवस असल्याने पावसापासून बचाव होण्यासाठी छत्री वाटपाचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रवादीचे युवा नेते भारत ताटे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी विविध सामाजिक उपक्रम घेऊन आदर्श असा वाढदिवस साजरा केला जातो. याही वर्षी बॅनरबाजी, पोस्टरबाजी आतिशबाजी व अनावश्यक खर्च टाळून समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली आहे. या कार्यक्रमास भीमनगर व गाव भागातील युवक,तरुण व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादीचे नेते भारत ताटे मित्र मंडळ भीम नगर परळी यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गुरूपौर्णिमा उत्सव आज (दि. १०, गुरुवार) मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.



या प्रसंगी संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला, तसेच श्रीगुरू ईश्वरबाबा महाराजांच्या समाधीची महापूजा करण्यात आली. कार्यक्रमात वारकरी मंडळींनी भजनसेवा सादर केली. त्यानंतर महाप्रसादाच्या पंगती पार पडल्या, ज्यात हजारो भाविकांनी सहभाग घेतला. पंचक्रोशीतील भाविकांनी समाधी दर्शन आणि महंतांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरूपौर्णिमा

शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाणारी ही गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्याची अनोखी परंपरा आहे. महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीस चार वेदांचे ज्ञान दिले. त्यांचा जन्म आषाढ पौर्णिमेला झाला होता, म्हणूनच हा दिवस गुरूपौर्णिमा म्हणून ओळखला जातो. हा दिवस केवळ अध्यात्मिकच नव्हे तर शैक्षणिक, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील गुरूंप्रती आदर व्यक्त करण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे, असे शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले.

# ठाकर आडगावचा राजवीर देशपातळीवर झळकला

## JEE परीक्षेत देशात ३२ वा क्रमांक पटकावत मराठा तरुणाचं घवघवीत यश; मनोज जरांगे पाटील यांनी केले अभिनंदन

जातेगाव । प्रतिनिधी

शिक्षणासाठी ग्रामीण भागातील संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मेहनतीच्या जोरावर मोठ्या पदापर्यंत पोहोचण्याचे उदाहरण पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव सारख्या छोट्या गावातील शेतकरी कुटुंबातील चि. राजवीर भारत कोकाट याने देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या गएए (जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) या परीक्षेत देशातून थेट ३२ वा क्रमांक मिळवत आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटवला आहे.



राजवीरचं हे यश संपूर्ण तालुक्यासाठी, जिल्ह्यासाठी आणि विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अत्यंत साध्या आणि शेतकरी पार्श्वभूमीतील घरातून येणाऱ्या राजवीरने अपार मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर हे यश प्राप्त केलं आहे. त्याच्या या घवघवीत यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन राजवीरचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार केला. त्याचबरोबर पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा देत, मराठा समाजातील विद्यार्थ्यांनी अशा प्रकारे पुढे येणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

सत्कार समारंभप्रसंगी मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष सुरेश ढास सर, वडील भारत कोकाट, तसेच कुटुंबातील सदस्य, ग्रामस्थ व शाळेतील शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजवीरच्या यशाने फक्त गावाचेच नाही तर संपूर्ण मराठवाड्याचे नाव उज्वल केले आहे. राजवीरने मिळवलेले यश ही केवळ वैयक्तिक कर्तृत्वाची झलक नसून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला बळकटी देणारा प्रेरणास्त्रोत आहे. अशाच विद्यार्थ्यांमुळे 'शिकूया, लढूया आणि जिंकूया' हा मंत्र प्रत्यक्षात उतरतो आहे.



# संस्कार विद्यालयात गुरु पौर्णिमा साजरी

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालयात इयत्ता तिसरी चौथी विभागात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कांबळे सर आणि विभागाचे विभाग प्रमुख गिरी सर अध्यक्ष म्हणून लाभले.

या कार्यक्रमांमध्ये चौथीच्या काही विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेविषयी माहिती सांगितली.

कांबळे सरांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन सांगितले. विभाग प्रमुख गिरी सरांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळुंके ताई यांनी तर आभारप्रदर्शन माने ताई यांनी केले.

# सिरसाळयातील घरकुल लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणार : सरपंच पठाण



सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा येथे घरकुल योजनेत ८३२ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहे. त्या लाभार्थ्यांना लवकरात लवकर लाभ मिळावा व एकही लाभार्थी घरकुल योजने पासून वंचित राहू नये यासाठी सिरसाळा येथे दिनांक ०८ जुलै २०२५ रोजी प्रकल्प अधिकारी संगीता देवी पाटील व गट विकास अधिकारी संजय केंद्रे, विस्तार अधिकारी भताने, इंजिनीयर बुरकुले, ग्रामपंचायत अधिकारी एसी शेख, सरपंच सोहेल पठाण यांच्या उपस्थीत बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकी मध्ये सरपंच सोहेल पठाण, फेरोज पठाण यांनी प्रकल्प अधिकारी यांना गावातील ८३२ लोकांच्या नावाने घरकुल मंजूर झाले आहे. त्यांना जागे सह घरकुल बांधून देण्यात यावे व त्या लाभार्थ्यांना तात्काळ लाभ मिळवून द्यावा अशी मागणी केली. यावेळी माजी सरपंच अक्रम पठाण, राम दादा किरवले, नदीम शेख आदी उपस्थित होते.

# सरस्वती विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहामध्ये साजरी

धारूर । प्रतिनिधी

गुरु म्हणजे ज्ञानाचा उगम.. गुरु म्हणजे अखंड वाहणारा झरा.. गुरु म्हणजे निष्ठा आणि कर्तव्य.. गुरु म्हणजे निस्सीम श्रद्धा आणि भक्ती.. गुरु म्हणजे विश्वास आणि वात्सल.. गुरु म्हणजे आदर्श... गुरु म्हणजे प्रमाणतेचे मूर्तिमंत प्रतिक. गुरुपौर्णिमा निमित्त गुरुंना वंदन करून शहरातील नामांकित विद्यालय सरस्वती धारूर या ठिकाणी उत्साह मध्ये गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.



या यामध्ये सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. सृष्टी महामुनी हिने केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ईश्वरी मुंडे त्यानंतर कार्यक्रमासाठी वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील प्रत्येक गुरूंचे वंदन केले. प्रत्येक गुरुला पुष्पगुच्छ देऊन गुरु विषयीची असणारी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक तोष्णीवाल सर, राठोड सर, कसपटे सर उपस्थित होते. शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी गुरु विषयी आपले मनोगत व्यक्त केली. यामध्ये गुरु आणि शिष्य यांचे नाते काय आहे याविषयी आपले मत मांडले. अत्यंत चांगल्या प्रकारे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुंडे सर, शिंपले सर, शिनगारे सर, बोबडे मॅडम, चरखा मॅडम, वैरागे सर, कंकाळ सर, खांडेकर सर, शिंदे सर, सोळुंके सर , वैभव सर, गांधले सर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दहावीच्या विद्यार्थ्यांनी विशेष अशी मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केला.

# गेवराई तहसील कार्यालयासमोर भंगार घोटाळ्याच्या चौकशीसाठी सय्यद एजाज यांचे आमरण उपोषण सुरु

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तहसील कार्यालयात झालेल्या कथित भंगार घोटाळ्याच्या चौकशीसाठी आणि तहसीलदार संदीप खोमणे यांच्या निलंबनाच्या मागणीसाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी गुरुवार, दि.१० जुलै २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाद्वारे त्यांनी गंभीर आरोप करत प्रशासनाकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.




उपोषणकर्त्यांनी केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये तहसीलदारांविरोधात चौकशी समिती स्थापन करणे, भंगार लिलावादरम्यानच्या कॅमेरा चित्रीकरणाची तपासणी करणे, गैरप्रकारे झालेला भंगार लिलाव रद्द करून उपविभागीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पुन्हा लिलाव घेणे आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत तहसीलदार संदीप खोमणे यांना निलंबित करण्याची मागणी आहे. सय्यद एजाज अहमद यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आवाहन केले आहे की, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

या कथित घोटाळयामुळे गेवराई तालुक्यातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. उपोषणकर्त्यांचा आरोप आहे की, तहसीलदारांनी भंगार लिलावात गैरप्रकार केले, ज्यामुळे शासकीय निधीचे नुकसान झाले. उपोषणाला स्थानिक नागरिकांचा पाठिंबा मिळत असून, प्रशासन काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्याप याबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी झालेले नाही. सय्यद एजाज अहमद यांनी उपोषणाद्वारे आपली मागणी पूर्ण होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष ब्रम्हादेव धुंरंधरे, शिवसेना शहर प्रमुख शेख शहेदाद, जुनेद बागवान, सादेक चाचु, शौकत पठाण, नईम शेख, बाळासाहेब गायकवाड, अर्जून सुतार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# आरोपी दिपक वावरे व इतर लोकांना तात्काळ अटक करून फिर्यादीला पोलीस संरक्षण देण्यात यावे!

गेवराई । प्रतिनिधी

दिनांक २८/०६/२०२५ रोजी अनुसूचित जमातीतील मौजे बगेवाडी येथील गंगुबाई गंगा भोसले व तिच्या वडिलांना गायरान वहीती करू नको म्हणून अंतरवाली (बु.) येथील गावगुंड दीपक वावरे व राम अंकुश वावरे, शेख वाहेद अब्दुल, सय्यद बुढण महेमूद या जातीवादी गावगुंडांनी गंगुबाई गंगा भोसले हिला व तिच्या वडिलांना बेदम मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या. म्हणून आरोपी दीपक वावरे व इतर लोकांवर अॅट्रॉसिटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून गुन्हा दाखल होऊन देखील आरोपी हे अद्याप मोकाट फिरत असून दि.०६/०७/२०२५ रोजी संध्याकाळी ५.३० दरम्यान दीपक वावरे हा त्याच्या सहकार्यासोबत आला व फिर्यादीस केस माघार घे नसता तुझ्या तुला व तुझ्या कुटुंबातील लोकांना जिवे मारून टाकीन अशी, तसेच तुमच्या विरुद्ध खोट्या-नाटया केसेस करून जेलमध्ये पाठवतो अशी धमकी देऊन शिव्या देत निघून गेला. आरोपी दीपक वावरे हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

दीपक वावरे यांनी यापूर्वी देखील गंगाबाई साहेबजी हीला अनेक वेळा मारहाण केलेली आहे. परंतु दीपक वावरे यांच्या दहशतीमुळे फिर्यादीने यापूप, त्यांचे विरुद्ध कारवाई केली नव्हती. दीपक वावरे यांच्यापासून गंगुबाई गंगा भोसले हिचे व तिचे तिच्या कुटुंबाला धोका असून तो त्यांचा घातपात करू शकतो. म्हणून तात्काळ फिर्यादीस पोलीस संरक्षण देऊन दीपक वावरे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने व त्याच्या विरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून (२२२/२०२१ तलवाडा पोलीस स्टेशन व इतर ठिकाणी) तसेच त्याने सदरील गुन्हे सामूहिकरीत्या केलेले असल्याने दीपक वावरे व त्याच्या सहकाऱ्यांवर कायद्याने कारवाई करण्यात यावी व पीडिता ही अनुसूचित जमातीची असून ती एक विधवा महिला आहेत.

ही भूमिहीन असून ती कसत असलेल्या गायरान जमिनीतून देखील तिला बेदखल करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच दीपक वावरे याच्यावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल असून देखील त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. म्हणून दीपक वावरे व इतर सहकारी यांना तात्काळ अटक करून पुढे त्याला त्याच्या न्याय द्यावा. अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

# डॉक्टरांनी मृत घोषित केलेले नवजात अर्भक झाले जिवंत

## स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील प्रकार, चौकशीचे आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉक्टरांनी नवजात अर्भक मृत घोषित केल्यानंतर ते जिवंत असल्याचा प्रकार अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात घडला. दोन दिवसांपूर्वीची घटना ही बुधवारी समोर आली आहे. संबंधित मुलाच्या वडिलांनी कुठलीही तक्रार दिलेली नाही. मात्र, या प्रकरणावर प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजेश कचरे यांनी सांगितले की, रुग्णालयाने स्वतःहून (सुमोटो) चौकशी करण्यासाठी पुढाकार घेतला असून, दोन समित्या नियुक्त केल्या आहेत.

होळ येथील एक महिला २७ आठवड्यांच्या गर्भाच्या संदर्भात तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाली होती. त्यादरम्यान, तिच्या गर्भाशयाची पिशवी फुटल्याचे निदान समोर आले. अन्य तपासण्यांमध्ये तिच्या गर्भातील अर्भक जिवंत असल्याची कुठलीही लक्षणे दिसत नव्हती. ७ जुलै रोजी संबंधित महिला प्रसूतीसाठी दाखल झाली. प्रसूतीमध्ये संबंधित




अर्भक ९०० ग्रॅम वजनाचे जन्मले. त्या वेळीही त्याची कुठलीही हालचाल दिसत नव्हती. त्याला रात्रभर काचेच्या पेटीत ठेवण्यात आले. सकाळी डॉक्टरांनी मृत घोषित करून ते बालक पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. होळ येथे गेल्यानंतर त्यांच्या घरातील एका ज्येष्ठ महिलेला नवजात बालकाच्या हालचाली जाणवल्या. त्यानंतर त्यांनी पुन्हा रुग्णालयात धाव घेतली. संबंधित बालकावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सांगण्यात आले.

# गुत्तेदाराच्या ढिसाळ कामावर लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## वीस जणांच्या जीवाशी खेळणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई होणार का?

वडवणी । प्रतिनिधी

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सोन्नाखोटा ते खडकी या रस्त्याच्या कामात झालेल्या हलगर्जीपणामुळे मोठा अपघात टळला. पुलाची पाहणी करत असताना अधिकाऱ्यांसमोरच खताने भरलेला ट्रक पर्यायी रस्त्यावर कोसळला.या घटनेत अधिकारी आणि ग्रामस्थ बालंबाल बचावले. पण या प्रकारामुळे रस्त्याच्या निकृष्ट कामाचा भांडाफोड झाला आहे.



या कामाचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले होते. तेव्हा हसतमुख फोटो झळकवणारे लोकप्रतिनिधी आता गप्प का, असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. गुत्तेदाराकडून दर्जेदार काम व्हावे, यासाठी प्रशासनाने यापूर्वीही सूचना दिल्या होत्या. मात्र कामाचा दर्जा पाहता त्या सूचना हवेत विरल्या की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. रुई पिंपळा गावचे सरपंच मयूर आंधळे यांनी यावर रोष व्यक्त करत म्हटलं, ग्रामीण भागात असल्याने दुर्लक्ष करता येणार नाही. यापुढे ढिसाळ काम सहन केलं जाणार नाही. रस्त्याच्या कामासाठी नऊ कोटींचा निधी असूनही कामात दर्जाचा अभाव स्पष्टपणे दिसतो. पालकांनी दिलेल्या निवेदनानंतर कार्यकारी अभियंता पाटील यांनी सांगितले की, गुत्तेदाराला नोटीस बजावली जाणार आहे. लोकप्रतिनिधींनी फक्त उद्घाटनापुरती जबाबदारी न घेता, काम पूर्ण होईपर्यंत जनतेसमोर उत्तरदायी राहावं, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. गुत्तेदार आणि प्रशासन यांच्यावर कारवाई होणार का, की पुन्हा निवडणूकपर्यंत सगळं विसरलं जाणार? हा खरा प्रश्न आहे ? का खरच गुत्ते दारावर कारवाई होणार. याकडे संपूर्ण माजलगाव मतदार संघाचे लक्ष आहे.

### आठ महिन्यापूर्वीच रस्त्याला मंजुरी परंतु पावसाळा सिजन मध्येच काम सुरू का?



अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार या पुलाचे काम सुरू होण्यापूर्वी कोणत्याही मार्गावर टाकले नाही पक्का पर्याय रास्ता न केल्याने ही दुर्घटना कार्यकारी अभियंता हेमंत पाटील यांचे डोळ्या समोर घडली आहे. याकडे अधिकाऱ्याने लक्ष देण्याची गरज आहे. या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ देणार नसल्याने रुई गावचे सरपंच मयूर शेठ आंधळे हे आक्रमक झाले आहे.

– मयूर शेठ आंधळे, रुई सरपंच

# शेतीसाठी रस्ता हा प्रत्येक शेतकऱ्यांचा हक्क : घोळवे

शिरूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन महसुल विभागातून शेतकरी बांधवा संबंधित विविध उपक्रम एकाच छताखाली राबवण्यासाठी छ.शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रम रायमोह येथे संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिरूरचे कर्तव्यदक्ष तहसिलदार सुरेश घोळवे तर प्रमुख अतिथी शिवराम राऊत (अध्यक्ष शिवश्री कृषि मंडळ) विठ्ठलराव मिसाळ (मा.सरपंच) काशिद (संपादक) हे होते. यावेळी रायमोह महसुली मंडळाच्या वतीने शहादेव सानप (मंडळ अधिकारी) व ग्राममहसुल अधिकारी अनिता मिसाळ, गणेश बडे, बाळासाहेब बांगर, मावळे, राठोड यांच्या संयोजना तून रायमोह मंडळा अंतर्गत शिरापूर-धू, हिवरसिंगा, खोकरमोहा, रायमोह, तागडगाव, वंजारवाडी, हाटकरवाडी या महसूल मंडळातील सज्जा अंतर्गत येणाऱ्या गावातील शिबिरामध्ये मुलांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे दाखले देण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला शंभर दिवसाचा कृती कार्यक्रमांतर्गत मयत खातेदार यांच्या वारस नोंदी कमी करणे, अज्ञान पालन कर्ता जे सज्ञान झालेले आहेत त्यांच्या नोंदी कमी करणे, वडिलोपार्जित जमिनी यांचे अदलाबदल असतील तर ते सलोखा योजने अंतर्गत वाटणीपत्र, नावामध्ये असणारी दुरुस्ती, एकत्र कुटुंब कर्ता असणाऱ्या नोंदी मोफत करण्याचा या शिबिरामध्ये अनेक शेतकरी यांनी लाभ देण्यात आला तसेच यामध्ये पीएम किसान अंतर्गत येणाऱ्या अडचणी बाबत, संजय गांधी योजना यांच्या पगाराच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी बाबत देखील मार्गदर्शन करण्यात आले शेतकऱ्यां च्या जिव्हाळ्याचा असणारा महत्त्वाचा विषय म्हणजे सज्जा अंतर्गत येणारे शेत रस्ते, पानंद रस्ते, नंबरबांध रस्ते, पारंपारिक वहिवाटीत असणारे रस्ते महसुली अभिलेख व गाव नकाशात घेणे, तुंबलेले रस्ते खुले करणे, घरकुल लाभार्थ्यांना साठी शासनाच्या दातृत्वा प्रमाणे मोफत वाळु उपलब्ध करणे, महसुली मंडळातील उडिद पीक पेरा विचारात घेऊन पीकविमा भरण्यास संधी, जूने असणारे फेर, मुळ सातबारा अभिलेखे तहसिल ऐवजी सज्जातूनच उपलब्ध करणे, अशा विविध विषयांवर मार्गदर्शन मान्यवरांनी केले. शिरापूर येथील शेतकरी जालिंदर गायकवाड यांचा शासनादेशा प्रमाणे सतत सहकार्यायामुळे कार्यकुशल ग्रा.महसुल अधिकारी श्रीम.अणिता मिसाळ यांचे आभार व व्यक्त करण्यात आले. रायमोह महसुलमंडळ कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या शिबिरासाठी ग्रामपंचायत अधिकारी, सुधाकर जाधव, माऊली शिंदे, भिमराव सानप, मंचिद्र चव्हाण, अनिल सानप, पत्रकार, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, शेतकरी उत्पादक कंपनी प्रतिनिधी, शेतकरी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी होती.

# पेठ बीड पोलीसांनी तीन वर्षांपासून फरारी असलेला आरोपी पकडला

बीड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनेक अव्यय धंद्यांना आता आवर घालण्यामध्ये पोलिसांना यश येत आहे. यामध्ये नव्याने पीठ पोलीस ठाण्यामध्ये रुजू झालेले शेख अल्ताफ या पोलीस कर्मचाऱ्यांच्या धाडसाचे कौतुक पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील जनतेच्या तोडून होत आहे.



आज दि.०८/०७/२०२५ रोजी पेठबीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन पेठ बीड येथे दाखल असलेला गु.र.नं. गु.र.नं.११८१/२०२२ कलम ३२८, १८८, २७२,२७३ भादवी गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी नामे शेख सोनू शेख बादल वय ३२ वर्षे रा. मोहम्मदिया कॉलनी मोमीनपुरा बीड हा बार्शीनाका इमामपूर येथे असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी डी.बी. पथकातील कर्मचारी पोअं/१९६० अल्ताप व पोअं/२१४६ शिवाजी यांनी सापळा लावून वर नमूद फारार आरोपी यास पकडून ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाही करत आहेत. सदरची कार्यवाही मा.पो.नि अशोक मुदिराज यांचे मार्गदर्शनाखाली पो/ १९६० अल्ताफ, पोअं/२१४६ शिवाजी नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

# महापुरुषांच्या जयंतीनिमित्त उभारण्यात आलेल्या ध्वजांची काळजी घ्या!

## ध्वजांची अवहेलना टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने लक्ष द्यावे : डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

महापुरुषांच्या जयंतीनिमित्त शहर व ग्रामीण भागात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. या उपक्रमांची सजावट म्हणून सार्वजनिक ठिकाणी चौकाचौकात, रस्त्यांवर, लोखंडी दुभाजकांवर व पथदिव्यांच्या खांबांवर विविध ध्वज लावले जातात.



मात्र, या ध्वजांची योग्य देखभाल न झाल्याने ते फाटतात, जीर्ण होतात आणि काही वेळा पायदळी तुडवलेही जातात. यामुळे त्या ध्वजांचे प्रतीकात्मक महत्त्व कमी होते, तसेच सामाजिक आणि कायदेशीर अडचणी निर्माण होतात. ध्वजांची विटंबना ही कायद्याचे उल्लंघन मानली जाते आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, ध्वज म्हणजे महापुरुषांच्या अस्मितेचे, त्यागाचे, बलिदानाचे प्रतीक आहे. त्यामुळे त्यांची अवहेलना होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**पोलिस प्रशासनाने दखल घ्यावी – ठोस मागणी**

जयंती कार्यक्रमासाठी पोलिस परवानगी आवश्यक असतेच. त्यामुळेच पोलिस प्रशासनाने प्रत्येक सार्वजनिक उत्सव समितीला ध्वज व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करताना लेखी सूचना द्याव्यात, असेही डॉ. ढवळे यांनी सांगितले. तसेच जयंतीनंतर ठराविक कालावधीनंतर जीर्ण, फाटलेले, खालवर पडलेले वा दुर्लक्षित ध्वज तातडीने काढून घेण्याची जबाबदारी देखील निश्चित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# विनाअनुदानित शिक्षकांना दिलासा; टप्पा वाढीचा प्रश्न मार्गी

## अधिवेशन संपताच वाढीव टप्प्याचा पगार खात्यात मिळणार: मंत्री गिरिष महाजनांची मोठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीच्या मुख्य मागणीसह इतर मागण्या करीता शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनाची गुरूवार दि.९ रोजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखल घेतली. शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीत दिले. त्या नंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून थेट आझाद मैदानात येऊन मंत्री गिरीश महाजन यांनी अधिवेशन संपताच वाढीव टप्प्या प्रमाणे आपल्या खात्यात पगार जमा होईल असे सांगून शासनाच्या धोरणा बाबत सविस्तर माहिती दिली. मंत्री गिरिष महाजनांच्या या माहिती नंतर शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले. यावेळी आ. श्री. विक्रम काळे, आ. श्री. किशोर दराडे, आ. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. श्री. किरण सरनाईक, आ. श्री. जयंत आजगावकर यांच्यासह शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मागील दिवसांपासून मुंबईच्या आझाद मैदानात विनाअनुदानित शिक्षकांनी विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढीसाठी निधीची तरतूद करा मागणीसाठी आंदोलन सुरु केले होते. दि.८ आणि ९ जुलै रोजी राज्यातील सर्व शाळा बंद आंदोलन करण्यात आले होते. सलग दोन दिवस शाळा बंद आंदोलन करून सर्व शिक्षक आझाद मैदानावर आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे सलग दोन दिवस आझाद मैदान आंदोलक शिक्षकांच्या गर्दीने हाउसफुल झाले होते. या आंदोलनावरुन विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप- प्रत्यारोप सुरु झाले होते. विनाअनुदानित शिक्षकांना न्याय मिळावा या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, खा. सुप्रिया सुळे यांच्यासह आ. रोहित पवार यांनी देखील शिक्षकांची आझाद मैदानात भेट घेत राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. त्यानंतर सरकारने आंदोलक शिक्षकांच्या शिष्टमंडळाची गुरूवार दि.९ रोजी बैठक झाली. या बैठकीत शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाला दिले. त्यानंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः आझाद मैदानात येऊन विनाअनुदानित शिक्षकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याची घोषणा केली. यामुळे विनाअनुदानित शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावेळी मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, आमची जी भूमिका आहे ती सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी हीच आहे. त्यामुळे धाडसी निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यानुसार २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के, ८० टक्के पगार खात्यात जमा केला जाणार आहे. सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. मात्र आता तुमचा प्रश्न मार्गी लागला आहे. तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हे ठरलं की, आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समाजावून घेऊन १८ जुलैला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील आणि यात कोणताही बदल होणार नाही असं मंत्री गिरिष महाजन यांनी सांगितले. त्या नंतर आंदोलक शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT